विज्ञानकथेतील मराठी भाषा*

जयंत नारळीकर

आजकाल अनेक प्रसंगी अशी टीका ऐकायला मिळते की मराठी भाषेवर इंग्रजीचे अतिक्रमण होत आहे. हे अतिक्रमण वापरत्या मराठीत येणाऱ्या इंग्रजी शब्दांच्या स्वरूपात असते. हे अतिक्रमण योग्य आहे का ? असल्यास ते सामावून घेऊन मराठी भाषा जास्त समृद्ध होईल का ? नसल्यास ते अतिक्रमण कसे थोपवून धरता येईल ?

ह्या मुद्यावर वरीच चर्चा होत आहे व होत राहणार. मला त्या चर्चेत भाग घ्यायचा नाही. परंतु, विज्ञानकथालेखनात जी मराठी भाषा वापरली जाते तिचे स्वरूप कसे असावे ह्याबद्दल थोडक्यात मत मांडायचे आहे.

प्रथम, मराठी भाषेत इंग्रजी शब्द ज्या दोन मार्गाने येतात त्यांची दखल घेऊ. खालील वाक्ये पहा :—

"रामचे बोलणे ऐकून श्याम फार एक्साइट झाला."

"टिकिटे सोल्ड आउट झाल्यामुळे आम्ही डिस्अपॉइंट झालो."

"गावसकरने ब्रॅडमनचे रेकॉर्ड ब्रेक केले."

"मॅनेजर साहेबांनी फक्त हाफ आवर लंच दिला."

"रेडिओवर नाइन ओ क्लॉक न्यूजमध्ये ही अनाउंसमेंट होती." इ. इ.

अशा वाक्यात जे अनेक इंग्रजी शब्द आलेत त्यांचा सर्वांचा दर्जा सारखा नाही. "टिकिट", "रेकॉर्ड", आणि "रेडिओ" हे शब्द असे आहेत ज्यांना पर्यायी मराठी शब्द पूर्वी उपलब्ध नव्हते– अजूनही नाहीत. (रेकॉर्डसाठी वापरला जाणारा "उच्चांक" हा शब्द माझ्या मते योग्य नाही. कारण अनेक रेकॉर्ड "निचांक" स्वरूपाचे असतात. उदाहरणार्थ सेंचुरी – चुकलो – शतक काढायला घेतलेला वेळ) असे शब्द घेऊनच मराठी भाषा वाढली आणि समृद्ध झाली.

परंतु "एक्साइट", "सोल्ड आउट", "डिसअपॉइंट" वगैरेंचा वापर आजच्या इंग्रजी माध्यमातील शालेय शिक्षणांचा परिणाम आहे. केवळ मराठी बोलायचा सराव नसल्यामुळे हे इंग्रजी शब्द तोंडी येतात. याचा अर्थ असा नव्हे की असे धेडगुजरी मराठी बोलणारा अचुक इंग्रजी बोलतो. त्याला इंग्रजी बोलायला सांगितले की त्या भाषेचाही तो खून पाडील.

अशा पार्श्वभूमीवर विज्ञानकथेच्या मराठी भाषेत (मला असे वाटते की) आजच्या विज्ञान-युगात जे वैज्ञानिक शब्द रूढ झाले आहेत ते परकीय भाषेतील असले तरी जसेच्या तसे घ्यावेत. उदाहरण म्हणून, रॉकेट, कंप्युटर, कंट्रोल पॅनल, न्यूक्लिअर रिॲक्टर, मायक्रोवेव्ह, टी. व्ही., व्हिडिओ इत्यादी शब्द मराठी भाषेत वापरले तर ते इंग्रजीचे अतिक्रमण होणार नाही.

मराठीतील इतर कथाप्रकारांपेक्षा विज्ञान-कथांना हा निकष अधिक उपयुक्त आहे. आपल्याला आवडो किंवा न आवडो, वस्तुस्थिती अशी आहे की विज्ञानातील नवे नवे शोध आणि तंत्रज्ञानातील आधुनिक निर्मिती, हे जगभर इंग्रजीतून

* वि. सा. संघाने आयोजिलेल्या प्रथम विज्ञान साहित्य संमेलनासाठी तयार केलेला निबंध.

प्रसिद्ध होतात. त्यामुळे नवी शब्दनिर्मिती आणि तिला लाभणारी जगन्मान्यता इंग्रजीतून बहुतांशी होते. तेव्हा अशा विज्ञानाच्या पार्श्वभूमीवर लिहिलेल्या कथांमध्ये पारिभाषिक इंग्रजी शब्द आले तर बिघडत नाही.

बहुतेक विज्ञानकथा आधुनिक किंवा भविष्यकालाची चित्रे रेखाटतात. त्या उलट ऐतिहासिक गोष्टींमध्ये भूतकालाचे चित्रण असते. शिवाजी किंवा बाजीराव यांच्याबद्दलच्या कथानकात पात्रांच्या तोंडी (ते इंग्रज नसले तर !) इंग्रजी शब्द; खटकतील—कारण त्यावेळी लोकांच्या भाषेत इंग्रजी शब्द नव्हते. उलट त्या काळी प्रचलित असलेले पण आजकाल वापरात नसलेले शब्द उदाहरणार्थ "मासाहेब", "अमात्य". "गनीम"; "स्वारी", "इकडून" (नवऱ्याबद्दल) इत्यादि मुद्दाम त्या ऐतिहासिक कालानुरूप वातावरण तयार करायला घातले जातात. त्याचप्रमाणे योग्य वातावरणनिर्मितीसाठी प्रचलित पारिभाषिक शब्द (कुठल्याही भाषेतले) विज्ञानकथांत घातल्यास हरकत नसावी.

ज्याप्रमाणे विज्ञानकथालेखन हे मराठी साहित्यात नव्याने रुजत आहे; त्याचप्रमाणे अशा साहित्याचे समीक्षणही. त्यामुळे विज्ञानसाहित्याचे समीक्षण ज्याप्रकारे व्हायला पाहिजे तसे क्वचितच होताना दिसते. अनेकदा टीकाकार समीक्षणाचे महत्त्वाचे मुद्दे बाजूला टाकून "लेखकाने भरमसाठ इंग्रजी शब्द वापरलेत" असा शेरा मारून जातात. मी आताच स्पष्ट केल्याप्रमाणे काही आवश्यक परकीय शब्द वापरणे हा टीकेचा मुद्दा ठरत नाही.

आता शेवटी "अनावश्यक" शब्दांविषयी ! विज्ञान साहित्य नव्हे तर प्रतिष्ठित समजले जाणारे इतर मराठी साहित्य, अनावश्यक इंग्रजीच्या वापरापासून मुक्त आहे का ? प्रख्यात लेखकांनी लिहिलेल्या गोष्टींत आणि लेखांमध्ये इंग्रजी शब्दांची खैरात सापडते. उदाहरणे द्यायची जरूर नाही—आजची प्रकाशने, दिवाळी अंक इ० उघडून पाहा, तशा भाषेत त्या लेखनाचे समर्थन करायचेच झाले तर असे म्हणता येईल : "आजच्या अर्बन सोसायटीचे करेक्ट पिक्चर अशाच भाषेतून व्यक्त होते." ज्या अर्थी टीकाकारांना ही भाषा सोसते तर मग एखाद्या विज्ञानकथाकाराने "कंप्यूटरने राजन्च्या विधानाला दुजोरा दिला" असे म्हटले तर त्याचे पोट का दुखावे ?

□ □

डॉ. जयंत विष्णू नारळीकर
७०१, कुलाबा हौसिंग सोसायटी,
होमी भामा मार्ग, मुंबई ४०००००५

॥ भरतशास्त्र ॥ एक माही नाटकपत्र
'संकल्प' या हौशी नाट्यसंस्थेचं प्रकाशन
संपूर्णतः नाट्यविषयास वाहिलेलं एकमेव मासिक
एका अंकाची किंमत : तीन रुपये.
एका वर्षाची वर्गणी पंचवीस रुपये.
पाच वर्षाची सवलतीची वर्गणी : एकशेएक रुपये.
वर्गणीदार कोणत्याही महिन्यापासून होता येतं.
वर्गणी, मनिऑर्डर अथवा ड्राफ्ट (मुंबई शाखेचा चेक)ने स्वीकारली जाते.
चेक 'भरतशास्त्र' या नावाने काढावा.
पत्रव्यवहाराचा पत्ता :
२८, लक्ष्मी बिल्डिंग, चमारबाग, क्रॉस लेन, परळ, मुंबई ४०००१२.